"नॉर्थ कॅनरा जी. एस्. बी. वृत्तविलास"
दि नॉर्थ कॅनरा गौड सारस्वत ब्राह्मण संघाची त्रैमासिक

# मुखपत्रिका

**कार्यालय फोन** : २३८७७३०१, २३८८००७३
**WEB SITE** : http://www.nkgsbsangh.org
**E-MAIL** : nkgsbs@gmail.com
**कार्यालयीन वेळ** : दुपारी ३ ते ७ (शनिवारी ३ ते ५)

।। वरं जनहितं ध्येयम् न केवला जनस्तुतिः।।

मूल्य रु. ५

क्रमांक ३ वर्ष : ३८ ऑक्टोबर-डिसेंबर २०१६

**BOOK PACKET (PERIODICAL)**
Regd. with Registrar of Newspaper of India, Reg. No. RN37436/80

**TO,**

**From :** The NKGSB Sangh, Laxmi Sadan, 361, V.P. Road, Mumbai - 400 004.

# दि नॉर्थ कॅनरा जी.एस.बी.संघ आणि
# दि नॉर्थ कॅनरा जी.एस.बी.इंडस्ट्रीयल अँड एज्यु. सोसायटी

# वार्षिक स्नेहसंमेलन - २०१६

## निमंत्रण पत्रिका

ज्ञातीतील सर्व बंधुभगिनींना नम्र विनंती आहे की आपण सर्वांनी ज्ञातीच्या येत्या वार्षिक स्नेहसंमेलनास उपस्थित राहून शोभा आणावी व कार्यक्रम यशस्वी करण्यास साहाय्य करावे.

**प्रमुख पाहुणे** : डॉ. मालिनी महेन्द्र नाडकर्णी, ख्यातनाम रेडिलॉजिस्ट

**स्थळ** : दादर माटुंगा कल्चरल सेंटर सभागृह, सावंत मार्ग, माहीम

**दिनांक** : रविवार २७ नोव्हेंबर २०१६, सायं. ४.१५ वाजता

## कार्यक्रम

- स्वागत गीत
- संघ व एज्युकेशन सोसायटीच्या अध्यक्षांची भाषणे
- प्रमुख पाहुण्यांचे मनोगत
- विशेष सत्कार : श्री. अरुण भास्कर कसबेकर
  संघाचे सन्माननीय सभासद केल्याबद्दल ( तपशील : पृष्ठ ५ )

- **मध्यंतर**

- विवाहाची सुवर्णजयंती ओलांडणाऱ्या जोडप्यांचा व ७५ वयोमर्यादा ओलांडणाऱ्या व्यक्तींचा सत्कार.
- कवळेंमठ संस्कृत पाठांतर स्पर्धेतील विजेत्यांना व एज्यु. सोसायटीतर्फे गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांना डॉ. महेन्द्र नाडकर्णी यांच्या हस्ते बक्षिसे.

स्नेह संमेलनासाठी वेगळे निमंत्रण पाठविले जाणार नाही.
याची कृपया नोंद घ्यावी.

**वि. सूचना :** गेली कित्येक वर्षे स्नेहसंमेलन डॉ. अंटोनिओ डिसिल्व्हा हॉल, दादर येथे भरविण्यांत येत असे. यंदाचे स्थळ माहीम येथे आहे याची कृपया नोंद घ्यावी.

**मारुती वि. दळवी**
कार्याध्यक्ष - संघ

**देवदास अ. नाडकर्णी**
कार्याध्यक्ष - एज्युकेशन सोसायटी

# संपादकीय

## स्नेहसंमेलनाच्या प्रमुख पाहुण्या डॉ. मालिनी नाडकर्णी

यंदाच्या ज्ञातीच्या वार्षिक स्नेहसंमेलनाच्या प्रमुख पाहुण्या आहेत निष्णात रेडिऑलॉजिस्ट डॉ. मालिनी नाडकर्णी. डॉ. मालिनी व त्यांचे यजमान डॉ. महेन्द्र (बाळ) गणपत नाडकर्णी हे दोघेही आपापल्या क्षेत्रांत तज्ज्ञ व अध्यापन विषयाशी निगडीत. दोघेही 'विद्या विनयेन शोभते' या उक्तीला साजेसे.

डॉ. महेन्द्र हे गणित विषयांत तज्ज्ञ. मुंबईतील इन्स्टीटयूट ऑफ सायन्स येथून एम्. एस्सी. मध्ये प्रथम वर्ग मिळाल्यावर ते अमेरिकेंत उच्च शिक्षणासाठी गेले. ब्राऊन युनिव्हर्सिटींतून डॉक्टरेट मिळाल्यावर तीन वर्षे त्यांनी तेथे काम केले. एकंदर आठ वर्षे अमेरिकेत घालविल्यावर ते भारतात परतले. सुरुवातीला कलकत्त्याच्या ख्यातनाम इंडियन स्टॅटिस्टीकल इन्स्टीटयूट मध्ये त्यांनी अध्यापन व संशोधन केले. नंतर मुंबई विद्यापीठांत १९८०-८२ या कालावधीत गणित विषयाचे विभागप्रमुख म्हणून काम केले. पण संशोधनाकडे लक्ष केंद्रीत करण्यासाठी त्यांनी विभागप्रमुखाची खुर्ची सोडली व प्राध्यापक म्हणूनच राहिले व १९९९ मध्ये निवृत्त झाले. त्यांचे अनेक संशोधन निबंध देशी व परदेशी नियतकालिकांत प्रसिध्द झाले आहेत. निवृत्तीनंतरही त्यांचे अध्यापनाचे कार्य सुरुच आहे. चेन्नई मॅथेमॅटीकल इन्स्टीटयुट, आय.आय.टी इंदूर सारख्या ठिकाणी ते अध्यापनांत अजूनही रस घेतात. इंडियन नॅशनल सायन्स ॲकेडमी व इंडियन ॲकेडमी ऑफ सायन्स या प्रतिष्ठित संस्थांचे फेलो म्हणून त्यांना सन्मानित करण्यात आले आहे. २००३-२००४ हे आपल्या एज्युकेशन सोसायटीचे शतसावत्सरीक वर्ष. त्या वर्षीच्या स्नेहसंमेलनांत दहा ज्येष्ठ शिक्षकांचा सत्कार करण्यात आला होता. डॉ. महेन्द्र यांच्या कार्याची दखल घेऊन त्यांचाही त्यावेळी सत्कार करण्यात आला.

डॉ. मालिनी या पूर्वाश्रमीच्या नेरुरकर. KEM रुग्णालयाशी संलग्न असलेल्या जी.एस्. मेडिकल कॉलेजच्या त्या एम्.डी. आहेत. रेडिऑलॉजी या विषयांत त्यांनी विशेष प्रावीण्य मिळविले. KEM येथेच त्या विषयाचे विभागप्रमुख म्हणून त्यांनी काम केले. तेथे त्यांनी क्ष किरण विभागामध्ये अनेक प्रकारच्या निदान पध्दती विकसित केल्या. 'हस्तक्षेपी क्ष-किरण शास्त्र' 'इंटरव्हेन्शनल रेडिऑलॉजी' या उपक्रमांची भारतामध्ये प्रथमच सुरुवात केली. तेथील जुन्या मशिनरींना फाटा देतांना अद्ययावत आयुधांऐवजी 'पाना आणि पाईप' या सामान्य आयुधांचा उपयोग करुन त्या विभागाचा कायापालट केला. अनेक अडचणींचे डोंगर ओलांडून, स्वतःच्या कष्टाने व कल्पकतेने, महापालिकेच्या लालफितींतून, तुटपुंज्या निधींतून हे घडले हे विशेष लक्षणीय. 'X-Files केईएम्च्या' या त्यांच्या पुस्तकांवरुन त्यांच्या धडपडीचा इतिहास त्यांच्याच शब्दांत वाचायला मिळेल.

डॉ. महेन्द्र व डॉ. मालिनी यांचे आपापल्या क्षेत्रांतील अनेक उल्लेखनीय योगदान नमूद करण्यासारखे आहे. पण जागेअभावी क्षमस्व.

१ ऑक्टोबर २०१६

द.गो.नाडकर्णी



## संघाच्या प्रोत्साहनाने आणि ठाणे मंच आयोजित



# वधूवर परिचय मेळावा

**दिनांक** : रविवार, २७ नोव्हेंबर २०१६
**वेळ** : सकाळी ९.३० ते १.००
**स्थळ** : दादर माटुंगा कल्चरल सेन्टर, सावंत मार्ग, माहीम
**नोंदणी शुल्क** : रु. २००



### विशेष सूचना


१. हा मेळावा फक्त गौ. सा. ब्राह्मण व सारस्वत उमेदवारांसाठी आहे.

२. पूर्व तयारीसाठी संबंधितांनी खालील पदाधिकाऱ्यांकडे १५ नोव्हेंबर पर्यंत आपला संपर्क नंबर देऊन नोंदणी करावी. या उपक्रमाला समाधानकारक प्रतिसाद न मिळाल्यास हा मेळावा रद्द करण्यांत येईल व त्याप्रमाणें संबंधितानां संपर्क नंबरावर तसे कळविण्यांत येईल.

### संपर्क

| **सुरेश पालेकर** | **मंजिरी कुलकर्णी** | **राजीव गायतोंडे** |
|---|---|---|
| ९९६९४५५३७० | ९६६५०९८११७ | ९२२४५०१८४५ |

Visit our website : www.nkgsbmatrimony.com



# मुंबई मंच - कारवारी मेळाव्याचे आमंत्रण



**'कारवारी खाद्यमेळाव्याला'** दरवर्षी मिळणाऱ्या उत्स्फूर्त प्रतिसादामुळे स्फूर्ती घेऊन यंदाही एक 'आनंद मेळावा' भरविण्यात येत आहे. पाककृतीशिवाय ज्यांना आपण बनविलेल्या वस्तू किंवा पदार्थ विक्रीसाठी किंवा प्रदर्शनासाठी ठेवायचे असतील, व ज्यांना बालगोपाळासाठी करमणुकीचे खेळ आयोजित करावयाचे असतील त्यांनाही गाळा मिळेल. इच्छुकांनी त्वरीत संपर्क साधावा.

**तारीख व समय** : रविवार २२ जानेवारी २०१७ संध्याकाळी ५.०० ते ९.००
**कार्यस्थळ** : सरस्वती बाग, जोगेश्वरी, के.जी एस. सोसायटी पटांगण
**आकार** : रु. ८०० एका गाळयासाठी
**संपर्क** : गाळा आरक्षणासाठी व पाककृती ठरविण्यासाठी. **(रात्री ७ ते १०)**

**रसिका गायतोंडे : ९९६७४३४४०१ राजू बोरकर : ९८२०९१७८४१**

**संपर्कासाठी अंतिम तारीख : १० जानेवारी २०१७.**

प्रथम नोंदणी करणाऱ्यास प्राधान्य
किस्मूर, एरप्पे, सुकरुंडे, हीट, पातोळी इत्यादींवर ताव मारण्यासाठी
सर्वांनी मोठया संख्येने हजर राहावे.

# प्रकाशझोत

## श्री. अरुण भास्कर कसबेकर हे संघाचे सन्माननीय सभासद म्हणून स्वीकृत

चर्चगेट येथे राहणारे श्री. अरुण कसबेकर हे आपल्या संघाला नेहमी उल्लेखनीय देणग्या देत असतात. त्यांचे मनोरंजनात्मक व अंतर्मुख करणारे लेख वेळोवेळी मुखपत्रिकेंत प्रकाशित होतात. त्यामुळे त्यांचे नांव आता बहुतेक ज्ञातिबांधवांच्या परिचयाचे झाले आहे. २ सप्टेंबर रोजी संघाची वार्षिक सर्वसाधारण सभा संपन्न झाली. त्यावेळी त्यांना संघाचे सन्माननीय सभासद म्हणून एकमताने स्वीकृत करण्यांत आले. पृष्ठ २ वर नमूद केल्याप्रमाणे २७ नोव्हेंबर रोजी होणाऱ्या वार्षिक स्नेहसंमेलनात त्यांचा जाहीर सत्कार करण्यात येईल.

७८ वर्षाचे कसबेकर यांचे शालेय शिक्षण कारवार येथील प्रख्यात हिंदू हायस्कूलमधून झाले. तेथील ऋषीतुल्य शिक्षकांचा त्याग व त्यांच्या आचार विचारांच्या संस्कारांचा कसबेकरांच्या आयुष्यावर बराच प्रभाव पडला. मुंबईच्या इन्स्टीटयूट ऑफ सायन्स मधून एम्. एस.सी (प्युअर मॅथेमॅटिक्स)ची फायनल परीक्षा अवघ्या तीन महिन्यावर असतांना कसबेकरांना इंडियन आयर्न ॲन्ड स्टील कंपनी (इस्को) मध्ये अतिशय सुरेख जॉब मिळाला. त्या जॉबकरिता एम. आय. टी. (अमेरिका) तसेच लंडनहून पी. एच.डी. झालेले उमेदवार पण प्रयत्न करीत होते. अशा सोन्यासारख्या संधीचा कोणीही अव्हेर करु शकत नव्हता. जॉब मिळताच त्यांना कंपनीच्या बर्नपूरला असलेल्या स्टील प्लांटमध्ये सहा महिन्याच्या ट्रेनिंगला पाठविले गेले. स्वत:च्या कर्तबगारीने ते कलकत्ता येथे झोनल मॅनेजर (ईस्ट इंडिया) या पदावर पोचले. पण काही कौटुंबिक कारणासाठी त्यांनी नोकरीचा राजीनामा दिला व मुंबईत येऊन स्वत:चा व्यवसाय सुरु केला. कंपनीत असतांना अनेक गरजू संस्थांना त्यांनी मदतीचा हात दिला. आपल्या समाजापुरतेच नमूद करावयाचे म्हणजे कवळें येथील श्री शांतादुर्गा देवस्थानच्या अग्रशाळेचा जीर्णोध्दार करतांना लागणारे स्टील, जे त्यावेळी दुर्मिळ होते, ते त्यांनी देवस्थानला वेळेत मिळवून दिले. देवस्थानचे तेव्हांचे विश्वस्त व सल्लागार हौसिंग बोर्ड कमिशनर श्री. डी. एस. बोरकर, कसबेकरांविषयी नेहमी कृतज्ञतेच्या भावनेने कौतुकौद्‌गार काढीत असत. तसेच वाळकेश्वर येथील आपल्या ज्ञातीच्या पूर्णानंद या सोसायटीच्या बांधकामाच्या वेळीही त्यांनी स्टील व पाईप्स वेळेवर कन्ट्रोल रेटने मिळवून दिले. त्यामुळेच ती वास्तु कमी खर्चात व कमी वेळेत पूर्ण होऊ शकली. शिवाजी पार्क येथील बालमोहन विद्यामंदिराचे सर्वेसर्वा श्री. दादासाहेब रेगे, त्यांच्या शाळेच्या एक्सटेन्शनकरीता स्टीलसाठी सगळीकडे प्रयत्न करुन शेवटी हताश होऊन इस्कोच्या ऑफिसमध्ये आले. श्री. कसबेकरांनी त्यांची संपूर्ण मागणी इस्को, टिस्को, एच. एस.एल. तसेच आर्यन मार्केटमधून स्वत:च्या ओळखीने गव्हर्मेंट कन्ट्रोल रेटमध्ये पूर्ण केली. त्या काळात स्टीलचा भयानक तुटवडा होता.

श्री. रेगेंनी कसबेकरांना बालमोहन शाळेत बोलावून त्यांचा खास सत्कार केला. माहीम येथील शांती नगर सोसायटीचे संपूर्ण स्टील सुध्दा कसबेकरांनीच मिळवून दिले.

श्री. कसबेकरांशी कोणी मराठीत बोलला तर ते त्याच्या स्टीलची मागणी इस्कोच्या स्टॉकमधून जेवढे शक्य तेवढे पूर्ण करत असत व जर कोणी ज्ञातिबांधवातला असला किंवा कोंकणीत बोलला तर इस्कोकडून स्टील देतच पण एच. एस. एल., टिस्को मधून सुध्दा स्वत:च्या ओळखीने उरलेला माल काढून देत असत.

नोकरीतून राजीनामा दिल्यावर त्यांनी पनवेल येथे अतुलीना केमिकल्स (इंडिया) प्रा. लि. या नावाने फॅक्टरी सुरु केली. कीटकनाशक औषध निर्मितीमध्ये पी. एन. पी. हा महत्वाचा घटक आहे. त्याची पूर्वी परदेशातून आयात करावी लागत असे. इम्पोर्ट सबस्टीटयूट म्हणून त्यांनी या घटकाची आपल्या कारखान्यात निर्मिती करण्यास सुरुवात केली व त्यावेळी दुर्मिळ असलेले परकीय चलन वाचवून अप्रत्यक्षपणे देशसेवाच केली. पाच वर्षे त्यांनी बनविलेले पॅरासिटामॉल डुफार इंटरफ्रान कंपनी 'क्रोसीन' या नांवाने विकत असे.

श्री. कसबेकर व त्यांच्या सुविद्य पत्नी सौ. मंगला (प्रभा) यांना अंध व्यक्तींविषयी विशेष कणव आहे. अंधांसाठी कार्य करणाऱ्या सेवाभावी संस्थांना ते सढळ हस्ते आर्थिक साहाय्य देतातच, त्याशिवाय कित्येक अंध विद्यार्थ्यांना त्यांनी वैयक्तीक पातळीवर मदत केलेली आहे. तब्बल २० वर्षे त्यांच्यासाठी पुस्तके वाचून दाखविणे, धडे स्वत:च्या आवाजात रेकॉर्ड करणे, अंधाना टेपरेकॉर्डर घेऊन देणे, अभ्यासाची उजळणी घेणे, परीक्षेच्या कक्षांपर्यंत त्यांना घेऊन जाणे, हॉलमध्ये बसून त्यांनी सांगितल्याप्रमाणे उत्तरपत्रिका लिहिणे अशा प्रकारची विधायक कामेही खास करुन मंगलाताईंनी केली आहेत. एका विद्यार्थ्याला तर त्यांनी पी. एच. डी. होईपर्यत मदत केली होती. त्याशिवाय किमान १० जणांच्या डोळयाच्या शस्त्रक्रियांच्या खर्चाचा भार त्यांनी उचललेला आहे. थोडक्यात कसबेकरांची "दानत" वाखाणण्यासारखी आहे. अनेक धर्मादाय संस्थांना विशेषत: वृध्दांसाठी ते सतत भरघोस देणग्या देत असतात. आपल्या संघाच्या वृध्दसेवा निधीसाठी त्यांनी त्यांच्या संपर्कात आलेल्या व्यक्तींच्या स्मरणार्थ १९ प्रसंगी देणग्या दिलेल्या आहेत व त्यांची एकूण रक्कम ३३ लाख रुपये आहे.

## कै. आनंद नाडकर्णी लिखीत 'कारवार' या पुस्तकाचे सौ. उषा राणे यांनी केलेल्या कोंकणी भाषांतरीत पुस्तकाचे प्रकाशन

१९५१ साली कारवार येथे कै. अ. का. प्रियोळकर यांच्या अध्यक्षतेखाली मराठी साहित्य संमेलन भरले होते. त्यावेळी स्थानिक मराठी मंडळाने दोन पुस्तके प्रकाशित केली होती. पहिले म्हणजे उ. कानडा जिल्हयांतील व्यक्तींनी लिहिलेले लेख, कथा, कविता,

संतवाङ्मय यांचा संग्रह असलेले पुस्तक. त्यांत पु. लं. चीही एक कथा आहे. हे पुस्तक हिन्दू हायस्कूलचे लोकप्रिय शिक्षक भेंडेमास्तर यांनी संपादित केले होते. दुसरे पुस्तक म्हणजे कै आनंद रामकृष्ण नाडकर्णी यांनी अथक संशोधन करुन लिहिलेले कारवारचे भौगोलिक, ऐतिहासिक, सामाजिक, सांस्कृतिक, दर्शन घडवणारे 'कारवार' हे पुस्तक. ही दोन्ही पुस्तके आता दुर्मीळ आहेत.

'कारवार' या मूळ मराठी पुस्तकाचा तेथील विदुषी सौ. उषा राणे यांनी कोंकणीत अनुवाद केला. सदाशिवगड येथे 'कोंकणी सांस्कृतीक मंडळ' ही एक सामाजिक संस्था आहे. या संस्थेतर्फे ३१ जुलै रोजी या पुस्तकाचे तेथेच नामांकित कोंकणी साहित्यिकांच्या उपस्थितींत समारंभपूर्वक प्रकाशन झाले. त्याच समारंभांत स्थानिक रसीक श्री. संदेश बांदेकर यांनी लिहिलेले 'म्हगेल बायल हुशार' या विनोदी नाटकाच्या पुस्तकाचेही प्रकाशन झाले.
('कारवार' ले. सौ. उषा राणे, मूल्य रु. २५०. उपलब्ध द. ना. नाडकर्णी, पारले ०२२-२६१२४१६२)

## पाककलानिपुण विद्या वागळे यांना पाककलास्पर्धेंत आणखी एक पारितोषिक

माहीम येथील पाककलानिपुण विद्या वागळे या नेहमी विविध पाककलास्पर्धेत भाग घेतात व पारितोषिक मिळवून येतात. मुखपत्रिकेंत वेळोवेळी त्याला प्रसिध्दीही दिलेली आहे. या विषयावर त्यांनी 'लज्जतदार कारवारी पाककृती' सारख्या बऱ्याच पुस्तिका प्रसिध्द केल्या आहेत. अलीकडेच 'मिनी क्रियेशन्स' या संस्थेतर्फे श्रावण महिन्यांत 'आंतर महिला मंडळ' पाककला स्पर्धा 'श्रावण महोत्सव २०१६' भरविण्यात आली होती. प्राथमिक फेरींत 'वनिता समाजा' तर्फे विद्याताईंना पहिला क्रमांक मिळाला. नंतर अंतिम फेरींत त्यांना तृतीय क्रमांकाचे पारितोषिक मिळाले. अंतिम फेरींत विठ्ठल कामत आणि वंदना गुप्ते परीक्षक म्हणून उपस्थित होते. या स्पर्धेच्या प्रायोजकांमध्ये लोकमत, एस्सेल वर्ल्ड, ऑर्किड, तन्वी हर्बल, फोंडाघाट फार्मसी इत्यादी नामांकित कंपनींचा सहभाग होता.

## कु. अवंती दीपराज भांडारकर हिचे उज्ज्वल यश

सांताक्रुज येथे राहणारे कै. भवानीशंकर विश्वेश्वर नाडकर्णी हे मुंबईत सेशन्स जज्ज होते. अत्यंत निस्पृह न्यायाधीश म्हणून त्यांची ख्याती होती. त्यांची कन्या डॉ. पल्लवी भांडारकर या ई.एन. टी. तज्ज्ञ तर त्यांचे यजमान डॉ. दीपराज भांडारकर हे लॅप्रॉस्कॉपी क्षेत्रांत तज्ज्ञ. त्यांची कन्या कु. अवंती ही ग्रॅन्ट रोड येथील क्वीन मेरी शाळेची विद्यार्थीनी. यंदा शालांत परीक्षेंत (आय.सी.एस.ई) ९५.३३% गुण मिळवून ती उत्तीर्ण झाली. आता तिने 'पेस' येथे विज्ञान शाखेंत प्रवेश घेतला आहे. मागे तिने बोर्नव्हिटा क्विझमध्यें दुसरे बक्षीस पटकावले होते. त्याचप्रमाणे ऑस्ट्रेलियन मॅकमीलन स्पर्धेत राज्यस्तरावर तिला पहिला क्रमांक मिळाला. 'हिन्दुस्थान टाईम्स' ची ५० हजार रुपयांच्या शिष्यवृत्तीची ती मानकरी आहे.

## आपल्या बँकेला बृहन्मुंबई नागरी बँक्स असोसियेशनतर्फे प्रथम पुरस्कार

बृहन्मुंबई नागरी सहकारी बँक असोसियेशनतर्फे अहवाल आणि कामकाज, सन २०१४-१५, या संदर्भात स्पर्धा आयोजित केली होती. ही स्पर्धा तीन गटात होती. ठेवीची रक्कम ३०० कोटीहून कमी, ३०० ते १५००, व १५०० हून अधिक. या तिसऱ्या उच्चतम गटात आपली बँक प्रथम क्रमांकाने विजयी झाली. २१ सप्टेंबर रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारणसभेंत संस्थेच्या अध्यक्षांच्या हस्ते पुरस्कारांचे वितरण झाले. बँकेतर्फे कार्यकारी संचालक श्री. चिंतामणी नाडकर्णी व संचालक श्री. नागेश फोवकार यांनी हा पुरस्कार स्वीकारला.

## वार्षिक कवळेंमठ संस्कृत पाठांतर स्पर्धेचे विजेते

कैवल्यपूर मठाधीशांच्या आशीर्वादाने यंदाही १८ सप्टेंबर रोजी विद्यार्थ्यांसाठी संस्कृत पाठांतर स्पर्धा घेण्यात आली. स्पर्धेचे सूत्रसंचालन संघाच्या कार्यवाह प्रा. प्राची देसाई यांनी केले. सर्व प्रथम संघाचे कार्यध्यक्ष श्री. मारुती दळवी यांच्या हस्ते दीप प्रज्वलन झाले. नंतर सर्व स्पर्धकांनी व्यासपीठावर येऊन सामुदायिकपणे सरस्वती स्तवन सादर केले. त्यानंतर प्रा. देसाई यांनी स्पर्धेचे उद्दिष्ट व पाठांतरासाठी गुण देण्याचे निकष विशद करुन सांगितले. त्या पश्चात मुखपत्रिकेच्या गेल्या अंकांत नमूद केल्याप्रमाणे शिशु व कुमार गटांतल्या स्पर्धकांचे श्लोक पठण झाले. मध्यंतरादरम्यान सर्व स्पर्धकांना श्रीमती कुसुम विश्वेश्वर वागळे स्मृती निधीतून रोख भेटी देण्यांत आल्या. निकाल जाहीर केल्यानंतर परीक्षक श्री. संजय रानडे व श्रीमती सुषमा पौडवाल यांनी स्पर्धकांना व त्यांच्या आईवडिलांना योग्य ते मार्गदर्शन केले.

### विजेत्यांची नावे

### शिशुगट

१. ऋतुजा मंगेश धुमे, दादर *
२. अयान गिरीश तेलंग, माहीम*
३. आर्या रवींद्र वर्टी, पारले

### कुमार गट

१. शुभम सचिन तेलंग, गांवदेवी **
२. अमेय मंदार पंडित, पारले
३. आदित्य विश्वनाथ (उल्हास) नेत्रावळी, पारले

* दिनकर लक्ष्मण कुलकर्णी व शिवानंद मंगेश वाघ स्मृतीप्रीत्यर्थ ठेवलेली पारितोषिके या विजेत्यांना मिळाली.

** आनंद गणपती वर्टी स्मृतीप्रीत्यर्थ ठेवलेले पारितोषिक या विजेत्याला मिळालें.

# अपारंपरिक पध्दतीने शिक्षण घेणारी कु. सखी हिला एम्. ए. परीक्षेंत दोन सुवर्णपदके

अपारंपरिक पध्दतीने शिक्षण घेणाऱ्या पुण्यातील एका शाळकरी विद्यार्थिनीला अमेरिकेतील एम्.आय्.टी. विद्यापीठांत प्रवेश मिळाला यासंबंधी अलीकडेच एक वृत्त छापून आले होते. माझी नात, सखी नितीन अनिता, हिचा नावाइतकाच शैक्षणीक प्रवासही अपारंपरिक. नुकतीच तिने Tata Institute of Social Science (TISS) चा MA (Women's Studies) हा दोन वर्षाचा अभ्यासक्रम पूर्ण केला व दोन सुवर्णपदके पटकावली, एक Best Student व दोन Best Field Work.

सखीचे नांव सर्वसामान्याप्रमाणे नाही, तिच्या पूर्ण नांवात आडनांवच नाही आहे फक्त वडिलांचे नांव नितीन व आईचे नांव अनिता. तिला आडनाव नाही म्हणून मराठी माध्यमाच्या शाळेत तिला प्रवेश नाकारला गेला. कितीही समजाऊन सांगितले तरीही. शेवटी तिला नाशिक येथे एका इंग्रजी माध्यमाच्या शाळेत प्रवेश मिळाला. एका पारसी बाईने ही शाळा सुरु केली होती. स्वत:हून आडनांव खोडून आईचे नांव लिहून 'सखी नितीन अनिता' हे नांव नोंदविले, आणि सखीच्या शालेय जीवनाला सुरुवात झाली.

सातवीपर्यंत अभ्यासात व शालेय उपक्रमात आनंदाने पुढाकार घेणारी सखी कालांतराने मार्क मिळविण्याच्या स्पर्धेत सामील झाली. तिचे आईवडील तिच्यात होत असलेल्या बदलाबद्दल तिला जागरुक करु लागले. वर्गात पहिली – दुसरी येण्यामध्येच 'हुशारी' असते का ? शाळेत शिकविलेल्या विषयांचे ज्ञान संपादन करणे म्हणजेच 'शिक्षण' का ? आपल्या देशात आणि इतर ठिकाणी सुरु असलेल्या शैक्षणिक विचारधारांबद्दल, उपक्रमांबद्दल ते तिला माहिती करुन देत होते. शिक्षणाचा खरा अर्थ काय ह्याबाबत ते तिच्याशी निरंतर चर्चा करीत असत, स्वत:च्या शिक्षणाचा वेगळा विचार करण्यास प्रवृत्त करीत असत. या सर्वांमुळे प्रेरित होऊन सखीने सातवी पूर्ण केल्यानंतर एक वर्ष शाळेत न जाण्याचा निर्णय घेतला. या एका वर्षात रोजच्या जगण्यातल्या शिक्षणाच्या 'जागा' शोधण्याचा मानस तिने व्यक्त केला – परंतु हे सर्व फक्त ह्या एकाच वर्षाकरिता. त्यानंतर पुन्हा शाळेचा मार्ग ती धरणार होती. शाळा अर्थातच या निर्णयामुळे नाराज झाली. तिच्या पालकांना समजावण्याचा, किंचित धमकावण्याचा प्रयत्न देखील झाला. पण तिच्या आई–वडिलांनी आपला आग्रह कायम ठेवला आणि सखी एका वर्षाकरिता 'शाळा–मुक्त' झाली.

या एका वर्षात ती काय करणार हे 'Skipping School' ह्या मथळयाखाली तिने स्वत:हून लिहून काढले. Internet वरुन बहुआयामी बुध्दिमत्ता (Multiple Intelligence) ची

एक चाचणी स्वत:हून घेतली व स्वत:मधील सात बुध्दिमत्तांचे मापन केले प्रत्येक बुध्दिमत्ता अधिक सक्षम करण्याकरिता नियोजन केले.

वाचनाची आवड असल्यामुळे, बरीच पुस्तके तिच्या संग्रही होती ती सर्व तिने एका कपाटात रचून मुलांकरिता वाचनालय सुरु केले. परिसरातील मुले घरी येऊन पुस्तके वाचू लागली, त्यावर बोलू लागली. छोटया मुलांकरिता तिने इंग्रजीतून संवाद करण्याचा वर्ग काढला – त्यात चार मुलांना शिकविले. मराठी माध्यमात दहावीत असलेल्या आपल्या स्वयंपाकाच्या बाईंच्या मुलाला इंग्रजीच्या अभ्यासात मदत केली. घर सजवायला, बागकाम करायला, स्वयंपाकात मदत, प्रयोग करायला लागली. रांगोळी, चित्रकला देखील आवडीने केली व त्यातून खूप आनंदही मिळविला. नाशिक सारख्या लहान शहरात रहात असल्यामुळे शाळेतील मित्र–मैत्रिणीनां भेटणे, गप्पा मारणे शक्य होते, त्यामुळे शाळेत न जाता देखील शाळेशी संपर्क तुटला नाही. या एका वर्षात ती फिरती व लिहिती देखील झाली. स्वत:हून प्रवास करायला शिकली. इंग्रजीत लिखाण करायची गोडी तिला लागली. त्या वर्षी तिने ३ पत्रके काढली. चार पानी Point of View असे नांव असलेल्या पत्रकात तिचे अनुभव, कविता, चित्र यांची अभिव्यक्ती होती.

परंतु सर्वात महत्वाचे म्हणजे मिळालेल्या मोकळया वेळात तिला स्वत:शी संवाद करण्यासाठी खूप वेळ मिळाला. तासन्तास शांत बसलेली सखी अनेकांनी त्याकाळात पाहिली. हे एक वर्ष भुरकन उडून गेले आणि परत शाळेत जायची वेळ आली तेव्हा सखीने जाहीर केले की ती यापुढे कधीच शाळेत जाणार नाही. या अनुभवाने तिला इतके समृध्द केले की शालेय शिक्षण तिला फारच तोकडे वाटायला लागले. तिचा हा निश्चय ठाम होता म्हणून तिच्या आई–वडिलांनी तो मान्य केला आणि त्यानंतर दोन वर्षे सखीने स्वत:चे शिक्षण स्वत:च्या हाती घेतले!

गणिताची आवड होती म्हणून परिचयातील एका स्नेही बाईंकडून गणित म्हणजे Logic, Applied Mathematics शिकायला लागली. एका निवृत्त शिक्षिकेकडून मराठीचे धडे घेऊ लागली. हे सर्व शालेय अभ्यासक्रमातील पुस्तकांच्या पलीकडले शिक्षण होते. आणि ते सुद्‌धा पैशांच्या मोबदल्यात नाही! गणिताच्या बाईंच्या क्लासमध्ये पडेल ती मदत करणे, मराठी शिकविण्याऱ्या बाईसोबत विविध विषयांवर गप्पा मारणे, हाच मोबदला होता त्यांच्याकडून ज्ञान संपादन करण्याचा. Times of India च्या नाशिक पुरवणीत सखी लिहायला लागली व त्याबदल्यात मिळत असलेल्या रु. १२५ मानधनाच्या चेकची मानकरी झाली!

स्व–शिक्षणाच्या या प्रवासात तिला भाषाशास्त्र या विषयाची गोडी लागली व त्यात पुढील शिक्षण घेण्याची इच्छा निर्माण झाली. परंतु ते शिक्षण घेण्याकरिता दहावी उत्तीर्ण होणे

गरजेचे होते कारण ते औपचारिक शाखेतील शिक्षण होते. म्हणून सखीने NIOS (SSC सारखाच परंतु National Board) मधून दहावीची परीक्षा देण्याचे निश्चित केले. NIOS च्या ७५ विषयांच्या यादीतून तिने ६ विषय निवडले व स्वाध्यायवर आधारित अभ्यासक्रम पूर्ण करुन चांगल्या गुणांनी दहावीची परीक्षा ती उत्तीर्ण झाली. नाशिकच्या ज्युनियर कॉलेजमध्ये प्रवेश घेतला व कोणत्याही क्लासला न जाता हसत खेळत १२ वी ची परीक्षा दिली आणि नाशिक विभागात १२ वी आर्टस् मध्ये चक्क पहिली आली. रिझल्टनंतर तिने पुढील शिक्षण IGNOU मधून BA ( English Literature) करायचे असे ठरविले. ज्युनियर कॉलेजच्या शिक्षणांनी ती अजिबात प्रेरित झाली नव्हती आणि स्वत:हून अभ्यास करण्याचे कौशल्य आत्मसात करुन BA करण्याचा तिचा मानस तिने पूर्ण केला.

BA करत असतानाच तिने डॉ. राणी व डॉ. अभय बंग यांनी महाराष्ट्रातील तरुण मुलांकरिता सुरु केलेल्या ‘निर्माण’ या उपक्रमात भाग घेतला व दोन वर्षांचे ते शिक्षण पूर्ण केले. तसेच उदयपूर स्थित स्वराज विद्यापीठातील 'Self - directed Learning' या दोन वर्षाच्या शिक्षण प्रक्रियेत ‘खोजी’ झाली. निर्माण आणि स्वराजने तिला स्वत:चा व समाजाचा शोध घेण्याकरिता नवी दृष्टी दिली. तिच्या खऱ्या आवडीची (Passion) जाण तिला त्यातून उमजली.

लिंगआधारीत विषमता व स्त्रीवाद या विषयांची दृढ आवड तिला TISS मधील दोन वर्षांच्या MA (Women's Studies) कोर्सकडे घेऊन गेली. व त्या कोर्सच्या theory व practice या दोन्हीमध्ये सुरुवातीला नमूद केल्याप्रमाणे दोन सुवर्णपदके पटकावली. २०१६ च्या गणतंत्र दिवसाच्या समारंभाकरिता दर वर्षी आपल्या देशातील विविध विद्यापीठातून १०० विद्यार्थ्यांची निवड केली जाते. TISS तर्फे सखीचे नामांकन ह्या करिता झाले व तिला २६ जानेवारी २०१६ ची परेड प्रधानमंत्र्यांच्या कक्षेत बसून बघण्याकरिता निमंत्रित करण्यात आले हा आम्हा सर्वांकरिता अपूर्व आनंदाचा क्षण होता. आणि आज सखी नितीन अनिता, मुंबईस्थित ‘अक्षरा’ हया संस्थेत सामील झाली आहे. वंचित घटकातील मुलींना कॉलेज शिक्षण पूर्ण करण्याकरिता ती जीवन शिक्षण (livelihood and life skills) देते.

सखीच्या ह्या आगळ्या-वेगळ्या शिक्षण-प्रवासाचे आम्ही सर्व कुटुंबजन साक्षीदार होतो. शिक्षणाचा खरा अर्थ उमजण्याची तिच्यामुळे आम्हा सर्वांना एक अनमोल संधी मिळाली. !

**सुमन माधव बोरकर, प्रभादेवी**
**(२४२२४१५६)**

# २०१६ - २०१९ कालावधीसाठी नव्या कार्यकारिणी

## एन्. के. जी. एस्. बी. संघ

**कार्याध्यक्ष :** मारुती वि. दळवी
**कार्योपाध्यक्ष :** शिरीष दि. वाघ
**कार्यवाह :** मंगेश भा. पालेकर व प्राची प्र. देसाई
**खजिनदार :** राजीव दि. गायतोंडे व प्रदीप नी. देसाई
**सभासद :** राजेश (किरण) वि. दिवेकर, वामन (विकास) मं. नाडकर्णी
देवदास अ. नाडकर्णी (स्वीकृत)

## ठाणे मंच

**कार्याध्यक्ष :** मारुती वि. दळवी
**कार्योपाध्यक्ष :** सुरेश मं. पालेकर
**कार्यवाह :** मंजिरी म. कुलकर्णी
**खजिनदार :** गिरीश मु. रेगे
**सभासद :** दुर्गादास शं. रेगे, चित्रा वि. कामत, राजेश वि. दिवेकर

## मुंबई मंच

**कार्याध्यक्ष :** मारुती वि. दळवी
**कार्योपाध्यक्ष :** शैलेश मं. गायतोंडे
**कार्यवाह :** प्रसाद दु. गायतोंडे
**खजिनदार :** विवेक सु. कुलकर्णी
**सभासद :** उदय गो. कसबेकर, राजीव ना. बोरकर, रसिका शै. गायतोंडे, मिहीर तेलंग


# YOGESH D. WAGLE

**YOUR ONE STOP SHOP AT GOA FOR**

• HEALTH INSURANCE • GENERAL INSURANCE • LIFE INSURANCE
• PERSONAL LOAN • CAR LOAN • HOUSING LOAN
• BUSINESS LOAN • MORTGAGE LOAN

Shop No. 2 & 3, Sapana Centre, Near Immaculate Church, Panaji.
**Mob. : 9901521411, 9901521502**
Email : yogeshwagle.karwar@gmail.com
yogeshwagle1975@rediffmail.co

# ठाणे मंच वर्धापन दिन

ठाणे मंचाचा वर्धापन दिन व श्रावणातील हळदी–कुंकूच्या निमित्ताने सादर केलेला 'श्रावण मासी हर्ष मानसी' हा कार्यक्रम मुलुंड येथील कालिदास सभागृहात २८ ऑगस्ट रोजी संपन्न झाला.

आपले बुजुर्ग श्री. दुर्गादास रेगे व श्री. अरविंद दिवेकर यांच्या शुभहस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले व कुलदेवतांचा आशीर्वाद घेऊन कार्यक्रमास सुरवात झाली.

नेहमीप्रमाणे 'ॐकार प्रधान' या गणेश वंदनाने सुरवात झाली. हे गीत गायले लता, प्रज्ञा. प्रिया व मृणाल यांनी. श्रावण महिन्यातील 'कृष्णाष्टमी' हा मोठा सण त्यामुळे कार्यक्रमाच्या पूर्वार्धात कृष्णाची नृत्ये व गाणी सादर केली. प्रथम छोटया काव्याने बाळकृष्णाच्या रूपात दर्शन दिले. भारतीय संगीतात मग ते शास्त्रीय असो वा पारंपरीक लोकनृत्य असो कृष्ण हवाच! कथ्थक या शास्त्रीय नृत्यप्रकारातील कृष्ण, राधा व गवळणी यांचे मोहक विभ्रम व अप्रतिम आविष्कार प्रियांका दळवी, गार्गी फोंडेकर व मिथिला गायतोंडे या नृत्यांगनानी दाखविला व शाब्बासकी मिळविली.

ऋता पाटील यांनी लिहीलेली कृष्णावरची छान कविता मीना कुलकर्णी यांनी चालीत म्हटली. त्यानंतर स्नेहा देसाई– रिमझिम पाऊस पडे सारखा, विनया नाडकर्णी – नको वाजवूस रे श्री हरी, प्रिया कुलकर्णी – थकले रे नंदलाला, प्रज्ञा वागळे – भावभोळया भक्तीची, प्रिया कुलकर्णी – आज गोकुळात रंग खेळतो व सर्वात शेवटी श्री प्रभात कुलकर्णी यांनी रुपे सुंदर सावरा (अभंग) भैरवी गाऊन कृष्णगीतांची सांगता केली. प्रत्येक कलाकाराने अतिशय तल्लीनतेने सुंदररीत्या कृष्ण गाणी पेश केली की सर्व वातावरणच कृष्णमय होऊन गेले, मन मोरपीस झाले. या पूर्वार्धाचे निवेदन मंजिरी कुलकर्णी यांनी केले.

हळदी कुंकवाची जबाबदारी आशाताई रेगे यांनी उत्तमरीत्या सावरली. व त्यांना साथ दिली लता पिकळे, सुधा दळवी व सुरेखा पालेकर यांनी. रेगेमामानीही त्यांना मोलाची मदत केली.

मध्यंतरात पाव–भाजी (अमर्यादित) पापड, लोणचे व सॅलॅड व मऊ बुंदीचा लाडू असा मस्त मेन्यू होता.

मध्यंतरानंतर पावसावरच्या कविता व गाण्याचा अक्षरशः पाऊस पडला. आपल्या सर्वांच्या आवडत्या बालगीताने 'नाचरे मोरे आंब्याच्या वनांत' पावसाला (मैफिलीला)

सुरवात झाली. हे गाणे मृणाल दळवी यांनी अगदी ठेक्यात गाइले. पावसात भिजायला लावणाऱ्या इतर कविता होत्या. १) मंजिरी कुलकर्णी, मिथिला गायतोंडे– मला ही आवडेल पाऊस व्हायला (सुरेश भट), गडद निळे, जलद भरुनि आले (बा.भ. बोरकर) २)वृंदा दिवेकर, सुषमा मुळगांवकर (श्रावणमासी हर्ष मानसी) बालकवी ठोंबरे ३) सुरेश पालेकर – सरींवर सरी (बा. भ. बोरकर) ४) मृणाल दळवी – 'मल्हाराची धून' (संगीता बर्वे) 'आला आषाढ – श्रावण' (बा.सी. मर्ढेकर) ५) सुधा दळवी 'पाऊस' (बहिणाबाई चौधरी) एका पेक्षा एक अशा लोकोत्तर कवींच्या कविता सादर केल्या.

'नाच रे मोरा'ने श्रोत्यांना ताल धरायला लावला. नंतर सलील चौधरीचे सुमधुर संगीत असलेले, 'ओ सजना बरखा बहार आयी' सुरेलतेने पेश केले प्रज्ञा वागळे यांनी पाडगावकरांचे शब्द व श्रीनिवास खळे याचे संगीत, 'श्रावणात घननीळा' सुंदर सादर केले प्रिया कुलकर्णी यांनी. खरंच! काही गाणी आपल्याला आयुष्यभर साथ देतात, त्यातलेच हे एक सर्वांगसुंदर गाणे. कुसुमाग्रजानी निसर्ग कविता फारश्या लिहील्या नाहीत पण त्याचे 'हासरा नाचरा जरासा लाजरा' हे गोड श्रावण गीत लता पिकळे यांनी छान सादर केले (संगीत अशोक पत्की) त्यानंतर 'घन घन माला नभी दाटल्या' हे मर्दानी गीत दमदारपणे (कोरसच्या) साथीने पेश केले प्रभात कुलकर्णी यांनी. अतिशय अल्पवेळात बसवलेले 'सांज ये गोकुळी' हे गाणे प्रज्ञा वागळे यांनी व 'बोट इथे स्वप्नातील संपली जणू' हे गाणे मृणाल दळवी यांनी सुमधुरपणे पेश केले. प्रिया व प्रभात कुलकर्णी यांनी 'अजहू न आये बालमा' ह द्वंद्वगीत बहारदारपणे पेश करुन Once more मिळवला. पावसाच्या गाण्याचे सूत्रसंचालन मिथिला गायतोंडे व मंजिरी कुलकर्णी यांनी केले. सर्व कार्यक्रमात संवादिनीची साथ श्री. प्रवीण देशपांडे व तबल्याची साथ श्री. श्रीकांत वेल्हाळ यानी करुन कार्यक्रमात रंगत आणली. कार्यक्रम आवडल्याची पावती सर्व प्रेक्षकांनी दिली.

सुधा दळवी यांनी आयोजकांचे, प्रेक्षकांचे व कलाकारांचे मनापासून आभार मानले. जोरदार पाऊस असतांनाही प्रेक्षकांनी अगदी माहीम जोगेश्वरी वरुन येऊन छान हजेरी लावली. सर्वच प्रेक्षकांनी कलाकारांनां प्रोत्साहन दिल्याबद्धल मनापासून धन्यवाद.

**मंजिरी मनोज कुलकर्णी, ठाणे**

कार्यक्रमासंबंधी अभिप्राय जरुर कळवा.

**मंजिरी कुलकर्णी**
९६६५०९८११७

**मिथिला गायतोंडे**
९८९२९६११८८

# माझी दिग्गजांशी झालेली जवळीक!
# आणि ती सुध्दा त्यांना एकदाही न भेटतां!!

## १. श्री. वसंतराव नाईक (मुख्यमंत्री - महाराष्ट्र राज्य)

१९६१ साली मी ज्युनिअर ऑफिसर (सेल्स) या पदावर इंडियन आयर्न ॲन्ड स्टील कंपनी लि. (IISCO) मध्ये रुजू झालो. मुंबईचे नरीमन पॉईंट आणि कफपरेड वरील कमर्शिअल झोन संपूर्णपणे श्री. वसंतरावांची कल्पना होती व तो त्यांच्या कारकिर्दीतला एक यशस्वी टप्पा होता. श्री. वसंतराव स्वत: त्या प्रोजेक्टच्या लहान-सहान गोष्टींमध्ये सुध्दा लक्ष घालायचे. सभासदांना स्टील मिळवून देणे यांत सुध्दां त्यांचा बराचसा सहभाग होता. या निमित्ताने १९६७-६८ दरम्यान मला त्यांचे कमीत कमी ४० तरी फोन कॉल्स आले असतील. "कसबेकर साहेब, मी श्री.... यांना तुमच्याकडे पाठवत आहे. मराठी माणूस आहे. त्यांना स्टील मिळण्याबाबत थोडी मदत करा." आणि मी सुध्दा माझ्या दृष्टीने सर्व प्रयत्न करुन त्यांना स्टील देत असे. मला अनेकवेळा त्यांनी त्यांच्या ऑफिसमध्ये बोलाविले होते. पण कधी योग आला नाही व मला जाण्याची इच्छाही झाली नाही. अनेकवेळा त्यांनी मला रुपये ४०० प्रति स्क्वे. मीटर दराने नरीमन पॉईंटमधील जागा घेण्यास सांगितली होती. ते म्हणत - "कसबेकर साहेब, तुम्ही माझी आयुष्यभर आठवण ठेवाल, मी सांगतो ती २००० स्क्वे. मीटर (२०,००० स्क्वे. फूट) जागा घ्या. भले कर्ज काढून घ्या. नंतर या भावात तुम्हाला ती कदापि मिळणार नाही वगैरे वगैरे. मला असे वाटते की त्या काळात बहुतांशी जी.एस.बी तरुणांत आलेल्या संधीचा फायदा घेणे व धन गोळा करणे अशी वृत्ती नसावी. मी पण त्याला अपवाद नव्हतो. पण आज विचार करतो की, ८ लाखाची जमीन आज कमीत कमी १०० कोटी रुपयांची झाली असेल. असो...

माझा वरळीला सुरेख फ्लॅट होता, पण १९६७-६८ साली कुकिंग गॅस सिलिंडर मिळणे खूपच कठीण होते. एकदा श्री. वसंतरावांचा फोन आलेला तेव्हां मी सहज त्यांना म्हणालो, - "साहेब, मला तुम्हाला एक विनंती करायची आहे. वरळीला माझ्या घरी गॅस सिलिंडर नाही. आपण या बाबतीत मला काही मदत करु शकाल का?" श्री. वसंतराव -"अरे, आपला अवि आहे की. मी अविला फोन करतो व तुम्ही सुध्दा अर्ध्या तासांनी मी देतो त्या नंबरावर त्याला फोन करा. तुमचे काम होईल." (अवि म्हणजे श्री. वसंतरावांचे चिरंजीव - श्री. अविनाश नाईक-त्यांच्या नावानेच बर्शेन गॅसची एजन्सी ती सुध्दा वरळीलाच होती.) मी अर्ध्या तासाऐवजी एका तासानंतर श्री. अविनाशना फोन करायचे ठरविले. पण तासाच्या आतच मला माझ्या पत्नीचा फोन आला की, कोणीतरी घरी दोन भरलेले गॅस सिलिंडर्स, शेगडी आणि सिलिंडर्सना जोडण्याची नळी घरी घेऊन आला आहे. मी काय करु? मी तिला ताबडतोब त्यांना

पैसे देऊन सामान ताब्यात घेण्यास सांगितले. पाचच मिनिटांत तिचा परत फोन आला व तिने सांगितले की, त्या माणसांनी पैसे घेतले नाहीत व गॅस शेगडीला जोडून ते निघून गेले, मी नाईक साहेबांना ताबडतोब फोन केला. पण साहेब म्हणाले– "कशाला आम्हांला लाजवता कसबेकर साहेब ! तुम्ही आमच्याकरिता किती कामे केलीत ? आम्ही एवढे छोटेसे काम तुमच्याकरिता करु शकत नाही ?"

**२. श्री. शेषराव के. वानखेडे – प्रेसिडेंट बी.सी.ए.–वानखेडे स्टेडियम**

माझ्या कल्पनेप्रमाणे ही १९७१–७२ सालची गोष्ट आहे. १९७२ ते ७७ श्री. वानखेडे आमदार तर होतेच. पण विधानसभेचे स्पीकर पण होते. सी.सी.आय.चे प्रेसिडेन्ट श्री. विजय मर्चंट आणि वानखेडे साहेबांची बी.सी.ए.च्या ब्रेबॉर्न स्टेडियममध्ये सीटस्च्या कोटाबद्दल तसेच रेव्हेन्यूबद्दल वादावादी झाली आणि वानखेडे साहेबांनी आपला निर्णय जाहीर केल की, सी.सी.आय. पासून एक किलोमीटरच्या आत मी इतकेच भव्य स्टेडियम १९७४ पर्यंत उभे करुन दाखवीन. It was totally an ego fight श्री. एम. डब्ल्यू. देसाई त्यावेळी इंडस्ट्रीज कमिशनर होते व त्यांच्या विनंतीमुळे मी या नवीन वानखेडे स्टेडियमला १००% स्टील मिळवून दिले. ते सुध्दा अगदी रेकॉर्ड टाईममध्ये. २–३ वेळा स्वत: वानखेडे साहेबांनी फोन करुन मला त्याबद्दल धन्यवाद दिले. एके दिवशी वानखेडे साहेबांचे सेक्रेटरी माझ्या ऑफिसमध्ये आले व त्यांनी माझ्याकडून मेम्बरशीप फॉर्मवर सह्या घेतल्या व दुसऱ्याच दिवशी बी.सी.ए. आणि गरवारे क्लब हाऊसच्या मेम्बरशीपचे कार्ड मला दिले. मेम्बरशीपच्या फीचे रुपये २५० मात्र माझ्याकडून त्यांनी घेतले नाहीत व सांगितले की, वानखेडे साहेबांनी ते स्वत:च माझ्यावतीने भरले होते. मी साहेबांना फोन केला, तर तेही अगदी वसंतराव नाईकांच्याच पध्दतीने म्हणाले –"कशाला आम्हाला तुम्ही लाजवता कसबेकर साहेब ? तुमच्या सहकार्यामुळेच मी माझी प्रतिज्ञा वेळेपूर्वीच पूर्ण करु शकलो" वगैरे वगैरे.

**३. श्री. यशवंतराव चव्हाण – डिफेन्स मिनिस्टर (संरक्षण मंत्री)**

१९६२ च्या चीन वॉर नंतर भारत सरकारने भुसावळ, चांदा आणि नागपूर येथे लाईट एम्युनिशनच्या फॅक्टरीज बनविण्याचा निर्णय घेतला व हा प्रोजेक्ट फक्त सहा महिन्यात पुरा करण्याचा संकल्प केला. श्री. एम. डब्ल्यू. देसाईंवर श्री. चव्हाण साहेब बरेच मेहेरबान होते. त्यांनी संपूर्ण बांधकामाचे साहित्य गोळा करण्याची जबाबदारी श्री. देसाईंवर टाकली. ते दिवस स्टील इंडस्ट्रीजच्या दृष्टीने अतिशय मंदीचे होते. बाजारात स्टीलचे भाव आमच्या भावापेक्षा बरेच कमी होते. पण बाजारात क्वॉलिटीची गॅरंटी नसते. श्री. देसाईंनी स्टीलची जबाबदारी संपूर्णपणे माझ्यावर टाकली. फक्त एका महिन्याच्या आत १००% स्टील मी तिन्हीं

फॅक्टरीजच्या साईटवर पोचते केले व तिन्हीं प्रोजेक्टस् मध्ये निव्वळ सहा महिन्यांमध्ये प्रत्यक्ष उत्पादन सुरु झाले व हा एकप्रकारे न भुतो न भविष्यती असा रेकॉर्ड झाला. श्री. यशवंतरावांनी मला वेळोवेळी फोन करुन भरपूर धन्यवाद दिले व माझ्या ऑफिसमधून अतिशय वाईट मंदीत हजारो टन स्टील विकल्याबद्दल पगारांत तीन स्पेशल इन्क्रीमेन्टस् मला दिल्या गेल्या.

**४. श्री. सिध्दार्थ शंकर रे (चीफ मिनिस्टर - वेस्ट बंगाल - काँग्रेस) आणि श्री. ज्योती बासू (चीफ मिनिस्टर - वेस्ट बंगाल सी.पी.एम.)**

या दोन्हींही दिग्गजांशी मी फोनवर बऱ्याचवेळा बोललेलो असेन. माझी कलकत्त्याला १९७६ मध्ये झोनल मॅनेजर - ईस्ट इंडिया म्हणून बदली झाली. कलकत्त्याचा मेट्रो प्रोजेक्ट (पाताल रेल-अंडरग्राऊंड रेल्वे) ची कामाची सुरुवात त्याचवेळी सुरु झाली होती. हा काळ सुध्दा आमच्या दृष्टीने खूपच मंदीचा होता. मी या दोन्हींही दिग्गजांना फोनवर पटवून दिले होते की अशा महत्त्वाच्या प्रोजेक्टमध्ये स्टीलची क्वॉलिटी उत्कृष्ट असणे आवश्यक आहे. सुरुवातीला श्री. सिध्दार्थ शंकर रे व नंतर श्री. ज्योती बासू च्या आशीर्वादाने इस्कोने SAIL ऐन मंदीत हजारो टन स्टील पुरविले व मला डेप्युटी चीफ सेल्स मॅनेजर - SAIL च्या पोस्टकरिता नॉमिनेट केले गेले. मला प्रमोशन अजिबात नको होते. कारण प्रमोशन नंतर मुंबईला ट्रान्सफर शक्यच नव्हते. कारण मुंबईला सर्वोच्च पद झोनल (SAIL) मॅनेजर म्हणूनच होते. शेवटी मी राजीनामा दिला व सरळ मुंबईला आलो. इस्कोने माझा राजीनामा सहा महिन्यानंतर अगदी नाईलाजाने स्वीकारला. मला कोणत्याही परिस्थितीत कलकत्त्याला बाकीचे आयुष्य घालवायचे नव्हते.

**५. श्रीमती इंदिरा गांधी - (पंतप्रधान)**

पनवेलच्या अलीकडे मुंबई-पुणे हायवेवर कामोठे नावाचे एक गांव आहे. तेथे महाराष्ट्र राज्य पुरस्कृत जवाहर इंडस्ट्रीयल को. ऑप. इस्टेटमध्ये, माझे परममित्र श्री. गणेश पै जे असिस्टंट इंडस्ट्रीज कमिशनर होते त्यांच्या आग्रहामुळे मी एक प्रशस्त प्लॉट अगदी हायवेला लागूनच घेतला होता. तेथे मी स्टील रोलींग मिल सुरु करणार होतो. पण नंतर माझा विचार बदलला व केमिकल फॅक्टरी घालण्याचे ठरले. PNP, PAP, PARACITAMOL, METOL व इतर बरेच केमिकल प्रॉडक्टस् छोट्या छोट्या प्रमाणांत करण्यासाठी तज्ज्ञांबरोबर मी मशिनरीची जुळवाजुळव करत होतो. त्याचवेळी एक जर्मन गृहस्थ Dr. Mayer Mader-Works Manager-Bayer (India) Ltd. रस्त्यावरची आम्ही लावलेली कंपनी आणि प्रॉडक्टस्च्या नावाची पाटी बघून सरळ आत घुसले व मला म्हणाले Mr. Kasbekar, please do not waste your time, energy and money in making so many products. Do only Para Nitro Phenol (PNP) and we will underwrite your

entire production."  एवढया मोठ्या जबाबदार माणसाच्या आग्रहाला बळी पडून आम्ही सगळा ले-आऊट बदलला. व मोठ्या प्रमाणात फक्त PNP करण्याचे ठरविले. साधारणतः ५-६ महिन्यात जवळ जवळ ५ टन माल तयार केला व सॅम्पल घेऊन मी स्वतः बायर इंडियाच्या नरीमन पॉईंटवरील एक्सप्रेस टॉवरच्या ऑफिसमध्ये गेलो. The Director (Purchase) श्री. मणी नांवाचे गृहस्थ होते. त्यांनी मी दिलेले सॅम्पल घेतले व मला सांगितले की, ते त्यांच्या जर्मनीतील लिव्हरकुझनमध्ये पाठवावे लागेल व त्यांचा रिपोर्ट येण्यास २-३ महिने तरी लागतील. या सर्व प्रकरणांत आणखीन एक गोष्ट माझ्या लक्षात आली की, PNP सबंध भारतात फक्त बायरच वापरत होते. आणि इतरांची मागणी अगदीच नगण्य होती. श्री. मणींनी मला जवळ-जवळ एक वर्षभर फक्त झुलवतच ठेवले. आमचे अक्षरशः पूर्णपणे दिवाळे वाजले होते. वीज-पाण्याचे बील न भरल्यामुळे त्याचा पुरवठा पूर्णपणे तोडला गेला होता. बँकेच्या ऑडिटर्सनी बँकेला आमची फॅक्टरी ताब्यात घेऊन लिलाव करण्याचा आदेश दिला होता. शेवटी वैतागून मी एके दिवशी श्री. मणींच्या ऑफिसमध्ये गेलो आणि त्यांना स्पष्ट सांगितले की, Dr. Mayer Mader च्या विनंतीमुळेच आम्ही या PNP च्या फंदात पडलो. आज मी तुमच्याकडून परचेज ऑर्डर घेऊनच बाहेर पडणार अथवा मला ४ जणांना बोलावून बाहेर फेकावे लागेल. मी स्वतःच्या पायाने तुमच्या केबीनमधून बाहेर जाणार नाही. असे म्हणताच श्री. मणी बरेच नर्व्हस झाले व त्यांनी मला सांगितले की, संपूर्ण PNP जर्मनीतील बायरच्या कारखान्यातूनच इम्पोर्ट केले जाते. त्यांनी एक किलो जरी माल भारतात बनवलेला घेतला तर कायद्याप्रमाणे PNP चा इम्पोर्ट पूर्णपणे बंद होईल. डॉ. मायर मेडर १० महिन्यांपूर्वीच जर्मनीला गेले होते. त्यामुळे PNP वर इम्पोर्ट बॅन आणल्याशिवाय काही उपाय नव्हता. मी ७-८ महिन्यांपूर्वीच इम्पोर्ट बॅन करण्याकरिता जी कार्यवाही करणे आवश्यक आहे ती सुरु केली होती. पण मणी साहेबांचे हात तेथे पूर्णपणे पोचले होते. माझे पोस्टाने पाठविलेले अर्ज दिल्लीच्या इम्पोर्ट-एक्सपोर्ट च्या ऑफिसमध्ये पोचताच फाडले जात असत. मी स्वतः कमीत कमी ४ वेळा या कामाकरिता दिल्लीला गेलो असेन. कधी माझा अर्जच गहाळ, कधी फाईलच गहाळ, कधी कन्सन्‍र्ड क्लार्क रजेवर वगैरे वगैरे. शेवटी वैतागून व हताश होऊन मी एक चार पानी टेलीग्राम श्रीमती इंदिरा गांधींच्या नावे पाठविला. त्यात माझी PNP प्रकरणाची, सर्व कथा आणि व्यथा सविस्तरपणे मांडली होती. आणि एक आठवड्याच्या आंत डॉ. जोशी-ॲड. कमिशनर ऑफ इंडस्ट्रीज माझ्या घरी एका शनिवारी दुपारी आले व त्यांनी माझी PNP बनविण्याची क्षमता मापण्याकरीता डिपार्टमेंटच्या इंजिनियर्सना माझ्या फॅक्टरीवर नेले. रविवारी रिपोर्ट घेऊन ते स्वतः दिल्लीला गेले. १५ दिवसांच्या आतच मला PMO च्या

ऑफिसमधील सेक्रेटरीचा फोन आला – "Mr. Kasbekar- A good news for you. The imports of PNP have been totally banned on the floor of the Parliament." मी त्यांना म्हणालो जर मॅडमना मला किमान फोनवर धन्यवाद देता आले असते, तर मी स्वत:ला फार भाग्यवान समजेन. त्यांनी मला एक क्षणभर थांबायला सांगितले आणि माझ्या कानावर खालील अमृततूल्य शब्द आले.


"Are you happy Mr. Kasbeker?"

मी ताबडतोब म्हणालो Madam! I have no words to express my happiness. I assure you my next ten generations will vote only for you and your party."

मला फक्त दुसऱ्या बाजूला मंद स्मित झळकल्याचा भास झाला.

**अरुण भास्कर कसबेकर**

**९८२०२९१३६५**

## ब्रिगेडीयर राजीव दिवेकर यांना आजोबा झाल्यानंतर डॉक्टरेटची पदवी

एखाद्या व्यक्तीमध्ये शिकण्याची आवड व जिद्द दोन्ही असेल की ती व्यक्ती काय करु शकते याचे उत्तम उदाहरण म्हणजे पुण्यातील माझा मामेभाऊ ब्रिगेडीयर (निवृत्त) राजीव गोपाळकृष्ण दिवेकर.

खडकवासला येथील नॅशनल डिफेन्स अकेडमीची खडतर परीक्षा उत्तीर्ण झाल्यावर त्याने सेनादलात प्रवेश घेतला. काहीं वर्षापूर्वी ब्रिगेडीयर या पदावरुन त्याने निवृत्ती घेतली. सेनादलामध्ये असतांनाच तो सिव्हील इंजिनीयरींगची परीक्षा उत्तीर्ण झाला एवढेच नव्हे तर सुवर्णपदकही मिळविले. त्या व्यतिरीक्त तो MBA ची परीक्षाही उत्तीर्ण झाला. सेनादलांतून निवृत्ती घेतल्यावर पुणे येथील Symbiosis Institute of Management Studies या प्रतिष्ठित समजल्या जाणाऱ्या संस्थेत तो डायरेक्टर या पदावर कार्यरत आहे. शिक्षण क्षेत्रांतील त्याच्या भरीव योगदानाबद्दल 'राष्ट्रीय विद्यागौरव सुवर्ण पदक' 'Education Leadership Award', 'Best Educationist Award' इत्यादी पदकांने त्याला गौरविण्यात आले आहे.

योगायोग म्हणजे आजोबा व डॉक्टरेट या दोन्ही पदव्या त्याला एकदमच मिळाल्या. वेळेचे नियोजन, शिस्त, शारीरिक तंदुरुस्तीबद्दल जाणीव, इत्यादी त्याचे गुण शिकण्यासारखे आहेत. ज्ञातिबांधवांनी त्याच्याकडून प्रेरणा घ्यावी म्हणून या लिखाणाचा प्रपंच.

**सुहासिनी अरविन्द वर्टी, जोगेश्वरी**

**ठाणे मंचतर्फे एक दिवसाची सहल**

**दिनांक :** रविवार ८ जानेवारी २०१७ **प्रस्थान :** माहीम, मुलुंड, ठाणे

**आकार :** रु. ७०० (आपल्या बँकेच्या नौपाडा शाखा, खाते १८१६ मध्ये भरण्याची सोय.)

**स्थळ :** अद्याप ठरलेले नाही. डिसेंबर महिन्यात संपर्क साधावा.

| सुरेश पालेकर | मंजिरी कुलकर्णी | राजू बोरकर |
|---|---|---|
| ९९६९४५५३७० | ९९६५०९८११७ | ९८२०९१७८४१ |

**SHREE HOMOEOPATHIC PHARMACY**

**Wholesale & Retail For :**

**Genuine Indian & Imported Homoeopathic Medicines**

Laxmi Ratan Co-op. Hsg., Shop No. 6, Opp. Karnataka Sangh Hall, Mogal Lane, Matunga (West), Mumbai - 400 016. Tel. : 2438 3092 / 2430 9035 Mob. : 98694 83433

Time : 9.00 a.m. to 8.00 p.m. **(SUNDAY CLOSED)**

**Mrs. Nandita D. Wagle, Dr. Divya D. Wagle (BHMS. Bom.) , Dr. Dilip M. Wagle (LCEH. Bom.)**

# “ओळख अनवट वाटेची” सौ. कुन्दा कुलकर्णी यांचा कविता संग्रह

अध्यापनक्षेत्राला वाहून घेतलेली, विद्यार्थी-वर्गाला अत्यंत प्रिय वाटणारी, विद्यार्थांना अभ्यासाव्यतिरिक्त निबंधस्पर्धा, नाट्यस्पर्धा वगैरेत सहभागी होऊन स्वत:चा सर्वांगीण विकास करण्यास उत्तेजन देणारी स्नेहल मार्गदर्शिका आणि म्हणूनच एक ‘आदर्श शिक्षिका’ या नात्याने जोगेश्वरीतील ‘अरविंद गंडभीर हायस्कूल’शी संबंधित सर्व विद्यार्थी-शिक्षकवर्गाला ज्ञात असणारी माझी जिवलग मैत्रीण “सौ. कुन्दा कुलकर्णी.”

“अनवट वाट कवितेची” हा तिचा कवितासंग्रह हातात आला, आणि त्याच्या मुखपृष्ठानंच प्रथमत: मोहिनी घातली! तो शान्त जलाशय, त्यात उमललेली ती आकर्षक फुलं, जलाशयाला लाभलेली लव्हाळ्याची किनार, आणि त्यांना छेद देणारा तो साकव, त्यांनीच मनाला एका ‘अनवट वाटेवर’ नेऊन सोडलं. आता त्या वाटेत भेटणाऱ्या कवितांबद्दल कुतूहल वाटणं, हे साहजिकच होतं!

या संग्रहातील विविध विषयांवरच्या, तशाच नानाविध प्रसंगांवर अधिष्ठित अशा अत्यंत प्रासादिक भाषेतील कविता रंजन करणाऱ्या तर आहेतच, पण त्याशिवाय हृदयाला स्पर्शून जाणाऱ्याही आहेत.

पावसासाठी आतुरलेल्या शेतकऱ्यांपासून सर्वांच्या मनाची व्याकुळता व्यक्त करताना ‘हे घना’, म्हणत कवयित्रीने मेघाला आर्तपणे साद दिली आहे. त्यातील ‘श्रेष्ठ कवीच्या यक्षदूता’ हे मेघाला दिलेलं अभिधान खरोखर भावमधुर वाटतं! लोकमान्य टिळकांचं पुण्यस्मरण करताना, ‘लोकशिक्षणार्थ वृत्तपत्रे महान अस्त्रे जणू भासली’ किंवा “शिवजयंती मान्य झाली लोकांप्रती, जनजागरणाची किमया झाली,” अशा कमीत कमी शब्दात लोकमान्यांचं मोलाचं कार्य समर्पकपणे मांडलं गेलं आहे. ‘नवरात्र’ म्हटलं, की देवीचं स्तोत्रगान आठवणं साहजिकच आहे पण कवयित्रीने त्या आधी सावित्रीबाई फुले, डॉ. आनंदीबाई जोशी, रमाबाई यांसारख्या आधुनिक क्रान्ति-वीरांगनांनाच देवीची रुपं मानून त्यांचं स्मरण केलं आहे. त्यानंतर आजच्या युगातील स्त्रीला ज्या समस्यांना तोंड द्यावं लागतं, त्याकडे लक्ष देण्याची विनवणीही तिने केली आहे, ती देवीला!

जुन्या रुढींना थोडंसं नवं परिमाण देत ‘रक्षाबन्धन’ कवितेतही दुष्ट प्रवृत्तींचा नाश करण्यासाठी ‘रक्षाबन्धन’ हे व्रत मानावं, यासाठी तरुणाईला साद घातलेली दिसते. आपल्या विद्यार्थ्यांच्या हृदयात मानवतेचं बीजारोपण करणारी एक शिक्षिका या नात्याने ‘दहावीच्या’ वर्गाच्या निरोपसमारंभात कवयित्रीने त्यांना एक हळवा प्रश्न केला आहे, “घरट्यातून नुकत्याच डोकावणाऱ्या, पिल्लांच्या पावलांनी उतरणाऱ्या, माझ्या बाळांनो, नाठाळाच्या माथी काठी हाणणारी, मानवधर्माला जागणारी, मुंबईला हवी असलेली व्हाल ना तुम्ही माणसं?”

बॉम्बस्फोटानंतर सारी मुंबईच हादरली. तेव्हा कवयित्रीच्या मनातील वेदनेनं असं शब्दरुप घेतलं:

“कधी मिळेल परत आम्हाला, आमचे साधेसुधे पण निश्चिंत निवान्त जीवन ?”

पक्षी – प्राणी–वृक्ष–वेलींची सृष्टी तिला अत्यंत जवळची वाटते म्हणूनच नागपंचमीच्या निमित्ताने नागराजाचा महिमा सांगताना ती म्हणते:

“विषाचे अमृत वैज्ञानिक करीतसे, जहरी नागराजा रक्षक बनतसे
सर्पकुलाचे आहे अमोलिक देणे, नागपंचमी सांगे, तुम्ही सर्वांनी रक्षिणे.”

शान्ततावादी नि आदर्शवादी विचार जोपासणाऱ्या कवयित्रीकडे इतरांचे चांगले गुण टिपण्याची विशालताही आहे.

शाळेच्या प्राचार्यांच्या निरोप–समारंभात तिने व्यक्त केलेली ही भावना हेच सांगते:

“अरविन्द गंडभीर शाळा मुलांनी गजबजलेली, पण तुमच्या प्रेमळ आणि सावध नजरेखाली निश्चिंतपणे विसावलेली.

कितीतरी आठवतात तुमचे बोल : “आनंदला त्रास होतो रोजचा जिना चढताना त्याचा वर्गच आणा बरं खाली.”

महाराष्ट्रातून शालान्त परीक्षेत प्रथम आलेल्या मंगेश म्हसकरसारख्या निम्नस्तरातील विद्यार्थ्यांला कवयित्रीने शालेय जीवनात पाठबळ दिलंच त्याशिवाय

“सर्वां सुखी करी, सुखी तूही होई, कर्तबगारीचा वास घेई, “हा काव्यात्मक आशीर्वादही दिला.

आपल्या सहकारी मैत्रिणीला उद्देशून ती कृतज्ञ भावनेने म्हणते:

स्नेहाच्या लहानशा कृती, हृदयाला जाऊन भिडती
उभारी देती जगण्याची, ठेव जणू मोरपिसांची

फिजिओथेरपिस्ट झालेल्या आपल्या विद्यार्थिनीने पायावरील शस्त्रक्रियेनंतर ट्रीटमेंट देऊन मनात जो आत्मविश्वास निर्माण केला, त्याबद्दल वाटणारं ऋणही व्यक्त करायला कवयित्री विसरलेली नाही : "You are with me, like a daughter caring for her mother."

“माझं माहेर, तथास्तु” या कवितांतून कुटुंबाबद्दलची तिची आस्था प्रकट होते.

‘अनवट वाटे’च्या एका वेगळ्या वळणावर कवयित्रीने आपल्या नातवंडाना उद्देशून, त्यांच्या रंजनासाठी, आपल्या कुटुंबियांच्या आनंद–सोहळ्याप्रसंगी लिहिलेल्या काही कवितांचाही अंतर्भाव या संग्रहात आहे. कधी ती गंमतीने म्हणते,

“बाळासाठी तिने घेतली हाती पाटी खरी,
शिक्षणपदव्या बाजूस ठेवून आजी शिकते अ आ इ ई”

तर कधी मागणी करते: “हास्यवदन पाहता पाहता आजी देवा विनवी
प्रौढत्वी निज शैशवास जपण्या सामर्थ्यचि देई.”

कवयित्रीच्या मनाची कोमलता दर्शविताना तिच्या विद्यार्थिनींनी, सहकारी मैत्रिणींनी व्यक्त केलेल्या भावनाही या पुस्तकात अंतर्भूत आहेत.

जिच्या कविता म्हणजे विद्यार्थ्यांबद्दल वाटणारी माया, मैत्रिणींशी जडलेला स्नेह, आप्तेष्टांविषयी ओथंबणारी आपुलकी आणि समाजाशी जुळलेला सुहृदभाव अशा नानाविध भाव-भावनांचा स्त्रोत आहे, तिच्यासाठी हीच शुभकामना व्यक्त करते की, "हा स्त्रोत असाच अखंड वाहता राहू दे!"

**सौ. नीलिमा शशिकान्त नाडकर्णी,**
**माहीम, - २४३०९५४४**

□ □ □ □

## 'साई भजनी रंगलो,' कै मोहन कसबेकर रचित व संगीतबध्द केलेल्या भजनांची अजित कडकडे यांच्या सुरांत सीडी

**कै. मोहन कसबेकर (प.पू.दादा भागवतांचे शिष्य) यांनी ४४ वर्षाआधी लिहिलेल्या व स्वत: संगीतबध्द केलेल्या भजनांची "साई भजनी रंगलो" ही सीडी अजित कडकडेंच्या सुमधूर सुरात टी सिरीजने प्रसिध्द केली आहे.**

**ह्याची प्रस्तुति नवनीत कसबेकरांची असून संकल्पना प्रसाद (पंकज) कसबेकरांची आहे. १७ भजनांची ही ऑडीओ सीडी मोहन कसबेकरांच्या ४४ व्या पुण्यतिथीस ऋषिपंचमीला (६ सप्टेंबर २०१६) प्रसिध्द झाली आहे. (किंमत ५५ रु) ही सीडी खालील पत्त्यावर उपलब्ध असून साई भक्तांनी येथे संपर्क साधावा.**

**"कसबेकर" बी-११०३, स्वप्नलोक टॉवर्स, फिल्म सिटी रोड,**
**मालाड (पूर्व), मुंबई - ४०००९७.**
**मोबाईल - ९१-९८२०५०१५५१**

www.kccgoa.in

# कोमल हिरवी तृणपाती ही
# अलगद झुलवी सर्वांग,
# कोवळ्या सुवर्ण प्रकाशात
# उजळून जाई आनंद



अप्रतिम निसर्गाने नटलेलं **सुखसमृद्धी**

**मंगेशाच्या देवळापासून २ मिनिटांच्या अंतरावर,**
**मंगेशी, फोंडा- गोवा**

**प्रॉजेक्ट मान्यताः** गोवा टाउन प्लॅनिंग
**कर्जसहाय्यः** नामवंत वित्त संस्था



मनाला भुरळ घालणारं गोव्याचं आल्हाददायक सृष्टीसौंदर्य, प्रदूषणविरहीत हवा, खळाळणारं पाणी आणि सोबत मंगेश, म्हाळसा, नृसिंह, नवदुर्गा अशा देव-देवतांच्या सान्निध्याने पवित्र झालेला परिसर याने नटलेला आमचा नवा प्रकल्प 'सुखसमृद्धी' म्हणजे नावाला साजेसं असं सुख, समृद्धी आणि मांगल्याचं वरदान ठरेल हे नक्कीच. निसर्गाच्या सान्निध्यात राहून मनःशांति मिळविण्यासाठी आजच आमच्याशी संपर्क साधा.

**फ्लॅटस् उपलब्धः १ रुम किचन, १ बी.एच्.के, २ बी.एच्.के**

a Project by:
KCC **कुणाल कन्स्ट्रक्शन कंपनी**

**मुंबई ऑफिसः** श्री. उमेश केरकर, 401, चौथा मजला, व्योम आर्केड, युनायटेड इंक कंपनीच्या बाजूला,
सुभाष रोड, विलेपार्ले (पू), मुंबई- 400057. टेलिः **2683 3841/47/ 72.** मोबाः **98336 36451**
फॅक्सः 2683 3872 ई-मेलः kunalconstruction@vsnl.net, kunalconstructiongoa@yahoo.in

गोवा ऑफिसः टी- १, रॉयल हाऊस, काझीवाडो, फोंडा- गोवा. मोबाः 98209 33352, 98206 33321

गोवा साईटः 95/1, वेलिंग, मंगेशी, म्हार्दोळ, फोंडा- गोवा

saadadvertising.com

## विवाह /वाङ्निश्चय

| | | |
|---|---|---|
| श्रुती विश्वेश्वर नाडकर्णी, जोगेश्वरी | व | अमीत शांताराम कामत, ठाणे |
| रासेश्वरी (अपर्णा) विजयानंद नाडकर्णी,मुलुंड | व | सिद्धेश विष्णु सावर्डेकर, बोरीवली |
| सारांश मुकुल रेगे, लोणावळा | व | सेजल सुहास मळवदे, अहमदनगर |

## ठाणे मंच देणगीदारांची यादी

| | | |
|---|---|---|
| १. | श्रीमती रोहिणी सुभाष कामत, जोगेश्वरी | २,५०० |
| २. | श्री. अरुण आत्माराम तेंडुलकर, बोरीवली | १,००० |
| ३. | श्रीमती अपर्णा सदानंद देसाई, ठाणे | ५,००० |

## विजूले चुटकुले

घोव : हँ पळयलँ? या पुस्तकांत बरयला की जास्त उलयल्यावर मनषालॅ 'वय' कमी जाता

बायल : आतां तुम्का कळ्ळे मूं? हांव पंचेचाळीस वयाची बायल पंचवीसावरी दिसता

---

जज्ज : तुगेलॉ वकील खंय आसा?

मारुती : माका वकीलाची गरज ना

जज्ज : अशॅ कशॅ?

मारुती : हांव स्वतःच फॉल्स उलवच्याक शकता

---

घोव बायलेले तंटे जाता. घोव राग्ग्यान घराभायर वता. रात्री भूक लागली की तो घराकडेन फोन करता.

घोव : जेवणांक किते आसा?

बायल, राग्ग्यान ; विष आसा

घोव : मगली वाट पळवनाका. जेव्न न्हीद

विजय सदानंद वागळे, ठाणे
९२२१६०७५७७

# अनुभव हॉलिडेजचे अरुण भट
# आदरांजली

काही माणसे आपल्या आयुष्यात खूप कमी कालावधीसाठी येतात व पण तरीही आपल्या मनावर ठसा उमटवून जातात. त्यापैकीच एक होते श्री. अरुण भट – अनुभव हॉलिडेजचे सर्वेसर्वा नुकतेच त्यांचे दु:खद निधन झाले. ठाणे मंचकडून त्यांना आदरांजली!

सप्टेंबर २०१३ मध्ये ठाणे मंचने कोस्टल कर्नाटकाची सहल अनुभव हॉलिडेज बरोबर आयोजित केली होती. तेव्हा श्री. अरुण भट यांनी स्वत: जातीने लक्ष घातले होते. काय केले नाही त्यांनी आमच्यासाठी! स्पेशल कारवार सहल, मुख्य म्हणजे मध्यरात्री कारवार स्टेशनवर ते स्वत: स्वागतासाठी आले होते. सर्वांच्या (शाकाहारी व मांसाहारी) जीभेचे चोचले त्यांनी पुरविले. वैयक्तीक लक्ष पुरविणे ही तर त्यांची खासियतच होते. 'राजा माणूस' म्हणतो ना आपण, अगदी तसेच होते ते! ज्ञानेश्वरीतील 'एक तरी ओवी अनुभवावी' असे म्हणतात. तसेच अनुभव ट्रॅव्हल्सचा एक तरी 'अनुभव' अनुभवावा असेच त्यांचे व्यक्तिमत्व होते (आपुलकीचे) अनुभव ट्रॅव्हल्सने आयोजित केलेल्या सहलीमध्ये पर्यटक असणे हा एक संस्मरणीय अनुभव!

श्री भट यांनी आपल्या व्यवसायाची सुरुवात शिक्षकी पेशाने केली. सुमारे ४० वर्षे त्यांनी गिरगांव येथे क्लासेस चालविले. गणित शिकविण्यात त्यांचा हातखंडा होता. त्यांच्याकडे शिकलेले अनेक विद्यार्थी आता देशात व परदेशात मोठया हुद्यावर आहेत. त्यांत आपल्या ज्ञातीतील सुध्दा अनेक विद्यार्थी आहेत. आपल्या बँकेचे माजी चेअरमन श्री. महेश आरस भटसरांचे लाडके विद्यार्थी होते. आरस अजूनही सरांचे ऋण मानतात.

देव त्यांच्या आत्म्यास शांती देवो.

**गिरीश रेगे (ठाणे मंच)**


# YOGESH D. WAGLE
**YOUR ONE STOP SHOP AT N. KARNATAKA FOR**


| | | |
|---|---|---|
| • HEALTH INSURANCE | • GENERAL INSURANCE | • LIFE INSURANCE |
| • PERSONAL LOAN | • CAR LOAN | • HOUSING LOAN |
| • BUSINESS LOAN | • MORTGAGE LOAN | |

17/2, Virupaksha Kripa, 1st Floor, P. B. Road, Hubli - 580029.
**Mob. : 9901521411, 9901521502**
Email : yogeshwagle.karwar@gmail.comyogeshwagle1975@rediffmail.com

## निधन

| | | |
|---|---|---|
| नयनतारा (तारा) वैकुंठ गंडभीर | (कणसगिरी) | सांताक्रुज |
| सरोजिनी गणपती गायतोंडे | (अस्नोटी) | वाळकेश्वर |
| कला दिगंबर इस्लूर | (शिरसी) | मीरा रोड |
| माधव शांताराम कामत | (कडिये) | कारवार |
| शिवानंद सदानंद कसबेकर | (कडवाड) | बंगळूर |
| सुहास सीताराम कसबेकर | (खारगे) | इंदूर |
| सलील विठ्ठल मिटबंदर | (अंकोला) | विरार |
| किशोरी विद्याधर मुझुमदार | (अंकोला) | वांद्रे |
| विनय (मोरेश्वर) नागेश नाडकर्णी | (सांवरपै) | पुणे |
| प्रभाकर वामन नाडकर्णी | (अगळी) | पुणे |
| दिलीप सदानंद नाडकर्णी | (अंकोला) | विरार |
| उमाकांत दत्तात्रय नाडकर्णी | (मल्लापूर) | माहीम |
| शांताबाई विश्वनाथ नेत्रावळी | (अंकोला) | अंकोला |
| मेधा महेश्वर पालेकर | (कडवाड) | प्रभादेवी |
| शामसुंदर शिवराव पालेकर | (बिणगे) | ठाणे |
| शुभदा (जयश्री) महेश्वर पिकळे | (अंकोला) | अंधेरी |
| अंजली (मंगला) रघुनाथ सुखटणकर | (सदाशिवगड) | बंगळूर |
| दिलीप कमलाकर तेलंग | (हारवाडे) | माहीम |
| सतीश राघवेन्द्र वाघ | (सदाशिवगड) | माहीम |
| मंदा रमेश वागळे | (माजाळी) | मालाड |
| सुनंदा रघुवीर वागळे | (बाड) | प्रभादेवी |

### दुःखद निधन



**विनय (मोरेश्वर) नागेश नाडकर्णी (सांवरपै) पुणे**

**जन्म :** ४ सप्टेंबर १९३२ (गणेशचतुर्थी) **निधन :** ६ ऑक्टोबर २०१६ (ललितापंचमी)

**प्रिय मोरेश्वरमामास**

**भावपूर्ण श्रध्दांजली**

**डॉ. मनीषा सतेज सबनीस, जोगेश्वरी**

## संघास व एज्युकेशन सोसायटीस मिळालेल्या देणग्या

**(मागील अंकानंतर)**

**उल्लेखनीय देणग्या**

### ॲडमिरल जयंत नाडकर्णी यांच्यातर्फे एज्युकेशन सोसायटीला दोन लाख रुपयांची देणगी

आपल्या ज्ञातीचे एक भूषण म्हणजे ॲडमिरल (निवृत्त) जयंत गणपत नाडकर्णी, त्यांना आपल्या ज्ञातीबद्दल विशेष आस्था आहे. त्यांची मेहुणी विदुषी लीला यशवंत दिवेकर यांचे गेल्या वर्षी निधन झालं. तेव्हा त्यांनी मुखपत्रिकेसाठी लीलाताईंवर एक खास लेख लिहिला होता त्यावरुनच ते ज्ञातीसंदर्भात किती रस घेत असतात त्याची प्रचिती येते. गेल्या जून महिन्यांत त्यांच्या पत्नी विमल, लीलाताईंच्या भगिनी, यांचेही निधन झाले. श्री. नाडकर्णी यांनी पत्नीच्या स्मृतीप्रीत्यर्थ एज्युकेशन सोसायटीला दोन लाख रुपयांची देणगी दिली आहे.

### श्रीमती उषा व श्री. शरद वागळे यांजकडून संघाला ५० हजार रुपयांची देणगी

राघववाडी, फ्रेंच ब्रीज, येथे राहणारे कै. काशिनाथ व कै मंजुळा वागळे यांचे सुपुत्र शरद व स्नुषा उषा यांच्या वैवाहिक जीवनाला ४ जून रोजी ५० वर्षे पूर्ण झाली त्यानिमित्त मुखपत्रिकेच्या गेल्या अंकात तपशीलासह त्यांचा फोटो छापून आला होता. त्यांच्या विवाहाच्या सुवर्णमहोत्सवी वर्षप्रसंगी त्यांनी संघाला ५० हजार रुपयांची देणगी दिली आहे.

### श्री. गिरीश तेलंग यांच्या स्मृती प्रीत्यर्थ वृध्दसेवा निधीसाठी ५० हजार रुपयांची देणगी

सुमारे तीन दशकापूर्वी संगणकाचा उपयोग बाल्यावस्थेत होता. अशावेळी गिरीश तेलंग यांनी संगणकाचे अद्ययावत तंत्रज्ञान शिकवण्यासाठी पुण्याच्या मॉडेल कॉलनीमध्ये आय्.आय्.टी नांवाची संस्था स्थापन केली. गेल्या पिढीतील बहुतेकांच्या परिचयाचे संयुक्त महाराष्ट्रवादी मंगेश (गुणा) तेलंग यांचे गिरीश हे सुपुत्र. आपली मंडळी कितीही बुध्दीमान असली तरी स्थैर्याच्या भीतीने नोकरीच करणे पसंत करतात. पण गिरीश यांनी आखाती देशांतील सिटी बँकेच्या संगणक विभागाच्या चांगल्या नोकरीला राम राम ठोकून स्वत:ची संस्था स्थापन करण्याचे धाडस दाखविले. गिरीश यांचे गेल्यावर्षी अकस्मात देहावसान झाले. त्यांचा मुलगा नीलेश यांनी वडिलांच्या स्मृतीप्रीत्यर्थ वृध्दसेवानिधीसाठी ५० हजार रुपयांची देणगी दिली आहे.

### श्री. जयवंत व श्रीमती सुमित्रा नाडकर्णी यांच्या स्मरणार्थ वृध्दसेवानिधीसाठी ५० हजार रुपयांची देणगी

माहीम येथे राहणारे श्री. जयवंत (बाबन) यशवंत नाडकर्णी हे कारवारचे जुन्या पिढीतील एक प्रतिष्ठित वकील कै वाय्. टी. नाडकर्णी यांचे सुपुत्र. त्यांची पत्नी श्रीमती सुमित्रा या सदाशिवगड येथील प्रसिध्द शिक्षक गणपतमास्तर नाडकर्णी यांच्या कन्या. श्री. जयवंत नाडकर्णी यांचे निधन मागेच झाले. तर सुमित्राताईंचे निधन अलीकडेच झाले. उभयतांच्या

स्मरणार्थ त्यांचे पुत्र श्री. अजित व कन्या सौ. वीणा देवीदास गायतोंडे यांनी वृध्दसेवानिधीसाठी ५० हजार रुपयांची देणगी दिली आहे.

**सौ. मंगला व श्री. अरुण कसबेकर यांच्यातर्फे अनुभव हॉलीडेजचे श्री. अरुण भट यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ वृध्दसेवानिधीसाठी ५० हजार रुपयांची देणगी**

आपल्या संघाला व एज्युकेशन सोसायटीला ज्या देणग्या मिळतात त्या बहुतेक देणगीदारांच्या आप्तजनांच्या स्मृतीप्रीत्यर्थ असतात. पण वेळोवेळी देणग्या देणारे श्री. अरुण भास्कर कसबेकर यांच्या देणग्यांचे कौतुक करण्यासारखे वौशिष्टय म्हणजे ते ज्या देणग्या देतात, त्या त्यांच्या नातेवाईकांव्यतिरिक्त ज्यांनी ज्यांनी अडचणीच्या प्रसंगी त्यांना मदतीचा हात दिला, तो सुध्दां कुठल्याही प्रकारच्या मोबदल्याची अपेक्षा न करतां, अशा निरलस व्यक्तींच्या स्मरणार्थ केवळ कृतज्ञतेच्या भावनेने दिलेल्या आहेत. कसबेकर यांचे एक अत्यंत जिवलग व दिलदार मित्र म्हणजे अनुभव हॉलीडेजचे श्री. अरुण भट. उभयतांच्या अतुट मैत्रीमुळेच ठाणेमंचतर्फे आयोजित केलेली कोस्टल कर्नाटकची टेलर मेड सहल स्वस्तांत यशस्वीपणे संपन्न झाली होती. श्री. भट यांचे नुकतेच १ ऑगस्ट रोजी निधन झाले. आपल्या या मित्राच्या स्मृतीप्रीत्यर्थ श्री. कसबेकर यांनी वृध्द सेवा निधीसाठी ५० हजार रुपयांची देणगी दिली आहे. श्री. कसबेकर यांची गेल्या दहा वर्षांतील ही १९ वी देणगी आहे व त्यांचीएकूण रक्कम ३२ लाख ५० हजार रुपयांहून अधिक आहे.

श्री. भट यांचा श्रध्दांजलीवजा परिचय याच अंकात अन्यत्र दिलेला आहे.

## संघास मिळालेल्या देणग्या

| | | |
|---|---|---|
| १. | सविता सबनीस फाउंडेशन तर्फे खालील व्यक्तींच्या स्मरणार्थ | |
| | श्रीमती स्नेहलता (चंपू) व श्री. वासुदेव गजानन सबनीस | २,५०१ |
| | श्रीमती सविता किशोर सबनीस. | २,५०१ |
| २. | श्री. घनश्याम गोपाल वर्टी यांच्या ८४ व्या वाढदिवसाच्या प्रसंगी त्यांच्या स्मरणार्थ कन्या श्रीमती सीमा अजय शेंबेकर यांजकडून. | १,५०१ |
| ३. | श्रीमती इंदिराबाई व श्री. शंकर सदाशिव वागळे यांच्या पुण्यतिथी निमित्ताने पुत्र श्री किशोर यांजकडून. | १,००१ |
| ४. | श्री. देवीदास पांडुरंग बोरकर यांच्या स्मरणार्थ श्रीमती शैलजा देवीदास बोरकर यांच्या वाढदिवसाच्या प्रसंगी कन्या श्रीमती सुनीता देवीदास बोरकर यांजकडून. | १०,००० |
| ५. | श्रीमती इंदिरा मंगेश नाडकर्णी यांच्या स्मरणार्थ स्नुषा श्रीमती वंदना प्रमोद नाडकर्णी यांजकडून. | ५,००० |
| ६. | श्रीमती वृंदा गजानन कसबेकर यांच्या स्मरणार्थ महिला हळदीकुंकू कमिटीस देण्यासाठी सर्वश्री आनंद व दिलीप गणपत आरस यांजकडून. | २,००० |

| | | |
|---|---|---|
| ७. | विवाहाच्या सुवर्णमहोत्सवी वर्षाच्या प्रसंगी श्रीमती उषा व श्री. शरद काशिनाथ वागळे यांजकडून. | ५०,००० |
| ८. | श्री. मोहन शांताराम कसबेकर यांच्या पुण्यतिथी निमित्त अनामिकाकडून | १,००१ |

## वैद्यकीय साहाय्याप्रीत्यर्थ

| | | |
|---|---|---|
| १. | श्रीमती स्नेहलता गोविंद कसबेकर यांच्या २ ऱ्या पुण्यतिथी निमित्त पुत्र श्री. विनय यांजकडून. | ३,००० |
| २. | श्रीमती विमल दत्तात्रय सुखटणकर यांच्या स्मरणार्थ स्नुषा श्रीमती माधुरी व पुत्र श्री. गणेश यांजकडून. | २१,००० |
| ३. | श्री. अनिल भालचंद्र तेलंग यांच्या पुण्यतिथी निमित्त पुत्र श्री पराग यांजकडून. | २०,००० |

## वृध्दसेवानिधीसाठी

| | | |
|---|---|---|
| १. | ७५ व्या वाढदिवसाच्याप्रसंगी श्रीमती दुर्गा वेंकटराव तेलंग यांजकडून | २,५०० |
| २. | श्री. मधुकर काशिनाथ नाडकर्णी यांच्या ५ व्या पुण्यतिथीनिमित्त पत्नी श्रीमती शालन यांजकडून. | १,००१ |
| ३. | श्री. विरुपाक्ष काशिनाथ वैष्णव यांच्या स्मरणार्थ स्नुषा श्रीमती विद्या व पुत्र श्री. किरण यांजकडून. | १०,००० |
| ४. | मामा व मामाआजोबा श्री. जगदीश दिगंबर वाघ यांच्या स्मरणार्थ श्रीमती उमा, श्री. आशीष (मांगिरीश) प्रमोद व कुमार जय कसबेकर यांजकडून. | ५,००० |
| ५. | श्री. मंगेश रुद्रा पालेकर यांच्या ९ व्या पुण्यतिथी निमित्त बहीण श्रीमती सुजाता सुब्राय वागळे यांजकडून. | ५,००० |
| ६. | श्री. दत्तात्रय गणपतराव सुखटणकर यांच्या स्मरणार्थ स्नुषा श्रीमती माधुरी व पुत्र श्री. गणेश यांजकडून. | २१,००० |
| ७. | श्री. गिरीश मंगेश तेलंग यांच्या स्मरणार्थ पुत्र श्री. नीलेश यांजकडून | ५०,००० |
| ८. | श्रीमती सुमित्रा व श्री. जयवंत यशवंत नाडकर्णी यांच्या स्मरणार्थ पुत्र श्री. अजित व कन्या श्रीमती वीणा देवीदास गायतोंडे यांजकडून. | ५०,००० |
| ९. | श्रीमती शांता (माई) व श्री. मंगेश महेश्वर नेत्रावळी यांच्या विवाहाच्या वर्षदिन प्रसंगी त्यांच्या स्मरणार्थ कन्या श्रीमती शुभदा रमेश वागळे यांजकडून. | १०,००० |
| १०. | श्री. रमेश गुणेश्वर वागळे यांच्या १ ल्या पुण्यतिथीनिमित्त पत्नी श्रीमती राजश्री व कन्या कुमारी रितु व रीचा यांजकडून | १,००१ |
| | श्री. शिवानंद शंकर तेलंग व श्री. किसन माजाळीकर यांजकडून | १,००१ |

११. आई श्रीमती सीताबाई (अम्मा) शानभाग व बहीण श्रीमती शांता पै यांच्या स्मरणार्थ श्रीमती सरोजिनी रमेश नाडकर्णी यांजकडून. २०,०००

१२. सासू सासरे श्रीमती सुनीती व श्री. मंगेश गोविंद मुळगांवकर व चुलतसासरे श्री. मनोहर गोविंद मुळगांवकर, आई, वडील श्रीमती उमा व श्री. प्रभाकर यशवंत तेलंग व काका श्री. मधुकर यशवंत तेलंग यांच्या स्मरणार्थ श्रीमती सुषमा सुबोध मुळगांवकर यांजकडून (प्रत्येकी रु. ५००० प्रमाणे) ३०,०००

१३. श्री. रामकृष्ण (अरविंद) गंगाधर सोहोनी यांच्या स्मरणार्थ पुत्र श्री. निखील यांजकडून. ११,०००

१४. श्रीमती उषा वसंत देसाई यांच्या ७५ व्या वाढदिवसानिमित्त कन्या श्रीमती नयना वासन, नात कुमारी ऐश्वर्या, बहीण श्रीमती सुरेखा जयंत नाडकर्णी व कुटुंबियांकडून. २५,०००

१५. सच्चा दोस्त अनुभव हॉलीडेजचे श्री. अरुण भट यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ श्री. अरुण भास्कर कसबेकर व सौ मंगला (प्रभा) यांजकडून. ५०,०००

## एज्युकेशन सोसायटीस मिळालेल्या देणग्या

१. श्री. माधव दत्तात्रय वर्टी यांच्या ८ व्या पुण्यतिथीनिमित्त पत्नी श्रीमती माधुरी यांजकडून. १,००१

२. चांगल्या कार्याप्रीत्यर्थ श्री. शशिकांत विनायक नाडकर्णी यांजकडून. २,५००

३. श्रीमती वत्सला बाळकृष्ण वाघ निधींतून संघामार्फत २,६००

४. ७५ व्या वाढदिवसाच्या प्रसंगी श्रीमती दुर्गा वेंकटराव तेलंग यांजकडून २,५००

५. श्री. घनश्याम गोपाल वर्टी यांच्या ८४ व्या वाढदिवसाच्या प्रसंगी त्यांच्या स्मरणार्थ कन्या श्रीमती सीमा अजय शेंबेकर यांजकडून. १,५०१

६. श्री. गजानन वासुदेव कसबेकर यांच्या स्मरणार्थ सर्वश्री आनंद व दिलीप गणपत आरस यांजकडून. ८,०००

७. आजी आजोबा श्रीमती मुक्ता व श्री. मधुकर आत्माराम वाघ व काका श्री. प्रदीप मधुकर वाघ यांच्या मोठेपणासाठी कुमारी अनिता अविनाश वाघ यांच्याकडून. १०,०००

८. श्री. शंकर रामकृष्ण कुलकर्णी यांच्या स्मरणार्थ बंधू व कुटुंबियांकडून १०,०००

९. श्रीमती दुर्गाबाई व श्री. रामकृष्ण गोविंद कुलकर्णी यांच्या स्मरणार्थ पुत्र श्री. अरविंद यांजकडून. ५,०००

१०. श्रीमती विमल जयंत नाडकर्णी यांच्या स्मरणार्थ पती ॲडमिरल(निवृत्त) जयंत गणपत नाडकर्णी यांजकडून. २,००,०००

११. श्री. रामकृष्ण (अरविंद) गंगाधर सोहोनी यांच्या स्मरणार्थ पुत्र श्री. निखील यांजकडून. ११,०००

Regd. with registrar of Newspapers of India under Reg. No. RN37436/80




हे पत्र संपादक, मुद्रक, प्रकाशक द. ना. नाडकर्णी यांनी
दि नॉ. कॅ. गौ. सा. ब्रा. संघ, मुंबई ४, यांच्यासाठी प्रसिद्ध केले.